1.3.2

प्रती,
प्राचार्य,
युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय, अमरावती,

विषय:- शेक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता भूगोल विभागाची शैक्षणिक सहलीला दि. १९/११/२०२१ रोजी चिखलदरा येथे नेण्याची संमती मिळण्याबाबत

माननीय महोदया,

भूगोल विषयात बि. ए. भाग ३ करिता अभ्यासक्रमात असलेल्या शैक्षणिक सहल अतर्गत आपल्या महाविद्यालयाची भूगोल विभागाची शेक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता दि. १९/११/२०२१ रोजी चिखलदरा येथे नेत्याचे ठरवण्यात आले आहे. करीत श्रध्दा टूर कंपनीची बावीस आसनाची बस ठरवण्यात अली आहे. तसेच सहलीमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालकांचे संपतीपत्र घेण्यात आले आहे. करिता सदर सहलीला आपली संमती देण्यात यावी हि विनती.

Dr. Anand R. Dhote
Head of Deptt. Geography
Yuvashakti Arts & Science College
Amravati.

Yuvashakti Arts & Science College Amravati

प्राचार्य
युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
अमरावती.

# युवा शक्ती कला व विज्ञान महाविद्यालय

## अमरावती

# *पर्यटन अहवाल*

# चिखलदरा




- मार्गदर्शक -

**प्रा.डॉ. आनंद धोटे**

भूगोल विभाग प्रमुख

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

२०२१-२२

Yuvashakti Art's & Science College ★ Amravati ★

प्राचार्य
युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
अमरावती

# युवा शक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
# अमरावती

## DEPARTMENT OF GEOGRAPHY

## CERTIFICATE

## STUDY TOUR REPORT

This is Certify that,

Shri / Ku. ______________________________ is a student of Geo. Dept of Yuva Shakti Art's And Commerce College, Chandur Bazar, has satisfactory carried out the Study Tour Report prescribed by University for the Under Graduate Degree course in Geography and the study Tour Report is submitted of Sant Gadge Baba University, Amravati, partial practical work of B.A. Part III for the academic year 2021-2022.

Teacher Incharge

Prof.Dr. Anand Dhote

Head of Department

Date : ____________

अनुक्रमणिका


१. प्रस्तावना

१.१ पर्यटनाचा उद्देश्य

१.२ पर्यटनाचा अर्थ

१.३ पर्यटनाच्या व्याख्या

१.४ पर्यटनाचे महत्व

२. भौगोलिक पार्श्वभूमी

२.१ स्थान व विस्तार

२.२ भूपृष्ठरचना

२.३ हवामान

२.४ मृदा

२.५ वनस्पती

२.६ प्राणीजगत

२.७ वाहतुक व दळणवळण

३. पर्यटन स्थळे

३.१ मेळघाट

३.२ चिखलदरा

i) भिमकुंड ii) गाविलगड किल्ला iii) पंचबोल पॉईंट iv) देवी पॉईंट v) पवनचक्की vi) सैनिकी शाळा

४. सेमाडोह

५ कोलकास

६. आर्थिक जीवन

७. सामाजिक जीवन

८. निष्कर्ष


Yuvashakti Arts & Science College * Amravati *

प्राचार्य
...शक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
अमरावती.

## १. प्रस्तावना

गेल्या काही काळापासून पर्यटनाबाबत सामान्य लोकांची संकल्पना अत्यंत झपाट्याने बदलत आहे. निसर्गरम्य निसर्गाच्या सानिध्यात काही क्षण घालावयास तसेच आनंद लुटायला प्रत्येकाला आवडते. त्यामुळे अनेक पर्यटक, विविध स्थळांना भेटी देतात. त्यामुळे पर्यटकाला मिळणाऱ्या विविध सुविधांचा पर्यटन स्थळांना तसेच पर्यटनाचा मानसशास्त्राचा विचार करणे ही काळाची गरज आहे. कारण देशातील आणि परदेशातील अनेक पर्यटनस्थळी भेटी देण्याकरिता आल्यानंतर आवश्यक असणाऱ्या मुलभूत सोई उपलब्ध असेल तरच पर्यटकांची संख्या वाढेल व पर्यटन स्थळांचा विकासही गरजेचे आहे.

प्राचीन काळापासून प्रवास हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग बनलेला आहे. त्याकाळी ज्या विविध कारणांनी प्रवास केला जात असे त्यात अज्ञात प्रदेशाचा शोध घेणे, नवीन व चमत्कारिक स्थळांचा शोध घेणे, नविन पर्यावरणातील बदल अनुभवणे, धार्मिकदृष्ट्या पवित्र स्थळांना भेटी देणे इत्यादी गोष्टीचा प्रामुख्याने समावेश होता.

सध्या ज्या मानवी व्यवसायाला पर्यटन म्हणतात. त्याचे मुळ या प्राचीन प्रवासात आढळते. प्रवासाच्या तुलनेत पर्यटन ही संकल्पना आधुनिक व शास्त्रीय आहे. प्राचीन प्रवासाच्या तुलनेत पर्यटन ही संकल्पना आधुनिक पर्यटन व्यवसाय भिन्न आहे.

### १.१ पर्यटनाचा उद्देश्य :

पृथ्वी वरील सर्व प्राण्यांमध्ये माणूस हा जिज्ञासू प्राणी आहे. म्हणूनच माणसाचे इतर सजीव सृष्टीच्या तुलनेने आपली स्थळाची वैशिष्टपूर्ण अशी वेगळी संस्कृती प्रस्थापित केली आहे. मानवाच्या जिज्ञासू वृत्तीतुनच नवनव्या ज्ञानविस्ताराच्या बाजु उजेडात आल्या मानसाची मानसिकता ही नाविण्य शोधण्याची असल्यामुळे विविध प्रकारचे भुखंडे शोधण्याचा तो प्रयत्न करित असतो.

भूगोल अभ्यासाला तौलणिक दृष्टीने अभ्यासण्यासाठी व त्या अभ्यासक्रमाचा अन्वयार्थ लावण्यासाठी सहलीच्या माध्यमातुन प्रत्यक्षरित्या मिळवलेल्या अनुभवाचा व ज्ञानाचा उपयोग होत असतो. पण तरीही वेगवेगळे भौगोलिक घटक, मानवी समाज व सांस्कृतीक घटक यांच्या प्रत्यक्ष परिणामातून शंका किंवा काही अनुत्तरीत प्रश्नांची समाधान शोधता येते. अशावेळी मानवी मनात निर्माण झालेल्या वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे आपल्याला तर्कशास्त्ररित्या शोधायचे असतील तर प्रत्यक्ष अवलोकन करणे महत्त्वाचे ठरते.

**उद्देश :**

- ❖ भौगोलिक व सांस्कृतिक पर्यावरणातील घटनांचा प्रथम अनुभव करणे.
- ❖ आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे.
- ❖ अप्रत्यक्ष ज्ञानाची सत्यता पडताळून पाहणे.
- ❖ प्रत्यक्ष घटना स्थळांना भेट देवून अभ्यास करणे.
- ❖ नवीन शोधातूनच भौगोलिक अभ्यास समृद्ध करणे हे सर्वच घटक पर्यटनाशी निगडित असतात.

## १.२ पर्यटनाचा अर्थ :

'पर्यटन' ही संज्ञा प्रवास या शब्दाशी संबंधीत आहे आणि प्रवास हा शब्द लॅटिन भाषेतील Tornos या शब्दापासून आलेला आहे. त्याचा अर्थ वर्तुळ असा आहे. याच शब्दापासून पुढे 'वर्तुळाकार प्रवास' किंवा 'पॅकेज टुर्स' हा शब्द रूढ झाला. इ.स. १६४३ मध्ये हा शब्द प्रथम वापरला गेला आणि त्याचा संदर्भ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे किंवा वर्तुळाकार प्रवास करणे वर्तुळाकार प्रवास करून निरनिराळी ठिकाणे पाहणे असा होतो.



प्राचार्य
...शक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
अमरावती

## १.३ पर्यटनाच्या व्याख्या :

१) हरमन श्युल्लर्ड या ऑस्ट्रेलियन अर्थतज्ञाच्या मते, "पर्यटन म्हणजे एक असा आर्थिक कार्यक्रम की, ज्यात लोकांचा प्रत्यक्ष देशांतर्गत किंवा परदेशी प्रवास, वास्तव्याचे ठिकाण एखादा देश, नगर किंवा प्रदेश या स्वरूपात असु शकते."

२) १९७६ मध्ये ब्रिटनमधील पर्यटन संस्थने पर्यटनाची व्याख्या करताना म्हटले आहे की, "पर्यटन म्हणजे लोकांनी त्यांच्या राहत्या स्थानापासुन काही अंतरा वरिल स्थानी अल्पकालीन केलेले स्थलांतर होय." हे स्थलांतर, संशोधन, व्यवसाय, मनोरंजन व ऐषआराम अशासाठी केलेले असते.

## १.४ पर्यटनाचे महत्त्व :

❖ पर्यटनामुळे आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या देशांना मोठ्या प्रमाणात परकीय चलन उपलब्ध होते.

❖ पर्यटन मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देते.

❖ आधुनिक पर्यटन व्यवसायाचा अत्यंत जलद गतीने विकास होत आहे.

❖ पर्यटनामध्ये होणारी वाढ जागतिक साक्षरतेत वाढ व लोकांच्या राहणीमानात वाढ घडून आणते.

❖ पर्यटनामुळे देशोदेशीचे लोक पर्यटन स्थळांना भेटी देतात त्यामुळे देशाची संस्कृती, इतिहास, सामाजिक, आर्थिक व राजकिय परिस्थिती जगातील इतर देशांना समजते.

❖ पर्यटनामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत प्रत्यक्ष करामूळे मोठ्या प्रमाणात भर पडते.

## २. भागौलिक पार्श्वभूमी

### २.१ स्थान व विस्तार :

चिखलदरा हे स्थान अमरावती शहराच्या वायव्येस असुन अमरावती जिल्ह्याच्या उत्तरेस आहे. २१°१५' ते २१°३०' उत्तर अक्षांक्ष व ७७° ते ७७°३०' पुर्व रेखांशावर हे स्थान वसलेले आहे. याची समुद्रसपाटीपासुन उंची ११७७ मी आहे. चिखलदराचे भौगोलिक स्थान सातपुडा पर्वताच्या कुशीत व पायथ्याशी आहे. चिखलदरा यांच्या उत्तरेस मध्यप्रदेश तर पूर्वेस छत्तीसगड हे राज्य आहे. चिखलदरा या भागाचे एकुण क्षेत्रफळ २५०७५० चौ.किमी आहे.

### २.२ भूपृष्ठरचना :

चिखलदरा हा प्रदेश बहुतांश पर्वतीय आहे. चिखलदरा येथील डोंगररांगा या वास्तविक सातपुडा पर्वतातील एक भाग आहे. येथील बराच भाग डोंगररांगांनी व्यापलेला असुन जंगल व्याप्त क्षेत्र अधिक आहे. वायव्येकडे सरासरी उंची २५००-२००० फुटापेक्षा जास्त दिसून येते. आग्नेयेकडे उंची १५००-२००० व २००० ते २५०० फुट दिसून येते. या ठिकाणी सरासरी उंची ८०० ते १००० फुटपर्यंत आढळते. जीन गडाच्या डोंगररांगा, सातपुडा पर्वताचेच तुटलेले फाटे आहे. या रांगाचा सर्वात जास्त भाग धारणी तालुक्यात दिसुन येतो. चिखलदरा हे सातपुडा पर्वताच्या गाविलगड शाखेत वसलेले आहे.

### २.३ हवामान :

चिखलदराचे भौगोलिक स्थान भारताच्या मध्यस्थानापासून जवळ असल्यामुळे या ठिकाणी मोसमी हवामान प्रकार आढळतो. तसेच चिखलदरा हे ठिकाण उंचावर वसलेले असल्यामुळे येथे तापमान कमी आहे. येथे उन्हाळे कडक तर हिवाळे थंड असुन कमाल तापमान ९१० F व किमान तापमान ६८० F इतके आढळते. त्याच बरोबर जुन ते ऑक्टोंबर या कालावधीत पाऊस पडतो. वार्षीक

Vidyabharati Art's & Science College * Amravati *



प्राचार्य
…शक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
अमरावती.

सरासरी पर्जन्य ३२.२ सें.मी. आहे. तर जुलैमध्ये सर्वाधीक ६५ सें.मी. पर्जन्य आढळते. येथे पावसाळ्यात बरेचदा दिवसादेखील दाट धुके आढळून येते.

## २.४ मृदा :

चिखलदरा येथील जास्तीत जास्त भाग पर्वतीय असल्यमुळे याचा परिणाम येथील मृदा वितरणावर झालेला दिसतो. धारणीच्या समतल भागात तापीच्या उगम स्त्रोताकडील भागात सुपीक गाळाची जमीन आढळते. पर्वतपायथ्याच्या सुपीक प्रदेश असून पर्वत पायथ्याशी असल्यामुळेच या भागात भूमिगत पाणी मोठ्या प्रमाणात आढळते. चिखलदरा हे डोंगराळ भागात वसलेले असल्यामुळे येथे लाल व काळी मृदा आढळते.

## २.५ वनस्पती :

विविध प्रकारच्या वनस्पतींनी परिपूर्ण असलेले जंगल म्हणून मेळघाटातील जंगल प्रसिद्ध आहे. या जंगलात वृक्षांच्या ९० प्रजाती, ६६ झुडूपांच्या जाती, ३१६ झाडापाल्यांच्या जाती, ५६ वेलीच्या जाती, २३ लव्हाळाच्या जाती, ९९ गवताच्या जाती आढळून येतात. त्यात सळई, मोथीन, हळद, चिंचोका, शिवन, बाभुळ, धामन, सिलव्हर, ओक, साज, धावडा, निंब, बिहाडा, केकड, सागवान, चिरपाईन, तेंदु, सिसम, बिजा, कळम, मोहा, तिवस, इत्यादी वनस्पती आढळतात. तसेच तिखाडीचे गवत आणि बांबु यांचेही उत्पन्न होते.

## २.६ प्राणी जगत :

मेळघाटाच्या पर्वतीय भाग प्रमाणात जंगलव्याप्त आहे. नोव्हेंबर ते फेब्रुवारी मध्ये जंगलाचे सौंदर्य बघण्याचा उत्कृष्ठ कालावधी आहे. प्राणी बघण्याचा उत्तम काळ उन्हाळा समजला जातो. उन्हाळ्यात पाणवठ्यावर प्राणी पहावयास मिळतात. मेळघाट मध्ये हरणाच्या जाती, पट्टेवाल्या खारी, शेकरू, उडत्या खारी

तालबंदा कोलकासच्या परिसरात दिसुन येतात. चिखलदरा ते सेमाडोह या रस्यातर अरवली पाहायला मिळतात.

## २.७ वाहतुक व दळणवळण :

कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक व सामाजिक विकास हा तेथील वाहतूक व दळणवळण यांच उपलब्धतेवर अवलंबून असते. अमरावती जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा या तहसिल मधील वाहतूक व्यवस्थेत प्रमुख रस्ते व इतर रस्ते आढळतात.

## ३. पर्यटन स्थळे

## ३.१ मेळघाट :

अमरावती जिल्ह्यातील सातपुड्याच्या दक्षिणेकडील रांगाच्या परिसरात मेळघाट व्याघ्र प्रकल्प वसलेला आहे. १९७३-७४ मध्ये याची स्थापना करण्यात आली. येथे दक्षिण उष्ण प्रदेशीय पानझळीचे शुष्क वन हा येथील वनाचा प्रकार आहे. 'मेळघाट' या शब्दाचा अर्थच घाळाचा मेळा असा होतो. निसर्गरम्य डोंगराळ प्रदेश उंच शिखरे आणि खोल दऱ्या असणाऱ्या या जंगलातही साग वृक्ष विपुल आहेत.

परतवाडा येथे या प्रकल्पाचे मुख्यालय असुन विश्रामगृहाचे आरक्षणही येथेच होते. कोलकाज, रायपुर, माखला, तालबदा येथील विश्रामगृहात मुक्काम करता येतो.

## ३.२ चिखलदरा :

अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा हे थंड हवेचे ठिकाण निसर्गरम्य वातावरणात लपलेल्या या प्रदेशाचा थेट महाभारताशी संबंध आहे. चिखलदरा हे स्थळ डोंगरात वसलेले आहे. या प्रदेशाचा राजा विराटचा मेव्हणा किचक याचा

Vidyabharati Arts & Science College * Amravati *



प्राचार्य
...शक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
अमरावती.

भीमाने येथे वध केला. त्या ठिकाणाला किचकदरा असे नाव पडले. कालांतराने या नावाचा अपभ्रंश होवून चिखलदरा या नावाने ओळखला जाऊ लागला.




i. **भिमकुंड :**

भिमकुंड ह्या पॉईंटला भिमकुंड हे नाव पडण्यामागे महाभारतातील आख्यायिका आहे असे म्हटल्या जाते की भिमाने किचक नावाच्या राक्षसाचा वध करून रक्ताने माखलेला हात याच दरीत धुतले म्हणून याला भिमकुंड हे नाव पडले ह्या दरीला किचक दरी नावाने ओळखले जाते. हा पॉईंट आठवणीत राहण्याचे कारण म्हणजे तेथील हिरवळ व सुंदर अशा उंचच उंच पर्वतरांगा आणि त्या पर्वतरांगामधुन ३६०० फुट उंचीवरून धो धो असा आवाज करत पडणारा धबधबा होय.

ii. **गाविलगड किल्ला :**

चिखलदरापासुन सुमारे ३ कि.मी अंतरावर गाविलगड किल्ला आहे. गवळी राजाने हा किल्ला बांधला म्हणून याला गाविलगड किल्ला म्हणतात. हा किल्ला समुद्रसपाटीपासुन ११४४ कि.मी. आहे. हा किल्ला पाहतांना प्राचीन वास्तुकलेची प्रचिती येते. या किल्ल्याला एकुण ३ दरवाजे आहेत.



iii. **पंचबोल पॉईंट :**

चिखलदऱ्यातील प्रमुख पॉईंटमध्ये येणारा हा पॉईंट असुन या पॉईंटच्या नावातच त्याचे वैशिष्ट्य दडलेले आहे. म्हणजे Five Sound येथे मोठ्याने ध्वनी दिला असता त्याचा फक्त एकच प्रतिध्वनी न येता एका पाठोपाठ एक असे पाच प्रतिध्वनी ऐकु येतात. हे ध्वनी एकानंतर एक पाच टेकड्या वरील दगडावर आदळून मोठा ध्वनी नंतर लहान लहान होत पंच ध्वनी आपल्याला ऐकु येतो हे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे.




Yavatmal Arts & Science College Amravati

प्राचार्य
यशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
अमरावती.

iv. **देवी पॉईंट :**

चिखलदरा या पर्यटन स्थळाला भेट देतांना सर्वांना आवडणारा असा पॉईंट म्हणजे देवी पॉईंट होय. या ठिकाणी गेल्यानंतर आपल्याला देवीचे दर्शन घेता येते. त्याचप्रमाणे देवीमंदीरात उजवीकडे असणारे महादेवाचे मंदीर त्यातच साईबाबांची तसेच गजानन महाराजांची मुर्ती होती.




v. **पवनचक्की :**

पवनचक्की हे अक्षय ऊर्जा साधनांमध्ये अत्यंत महत्त्वाचे ऊर्जा साधन आहे. प्राचीन काळापासून वाऱ्याचा उपयोग जहाज वाहतुकीसाठी, पिठ गिरण्या किंवा पाणी उपसा पंप चालविण्यासाठी केला जात होता. वाऱ्याच्या गतिज शक्तीचा उपयोग करून त्यापासून विद्युत निर्मीती केल्या जाते. चिखलदरा तालुक्यातील मोथा या ठिकाणी दोन पवनचक्क्यांची भारत सरकार व्दारे उभारणी करण्यात आली. हे ठिकाण चिखलदऱ्याला येणाऱ्या पर्यटकांसाठी एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ बनले आहे. या दोन्ही पवनचक्कीपासून दोन मेगावॅट विज निर्मीती होते. ही विज शहानुर प्रकल्पाला पुरविली जाते.

४. सेमाडोह

मेळघाटात धारणी तालुक्यात निसर्गरम्य वातावरणात सेमाडोह वसलेले आहे. सेमाडोह मध्ये सर्वदुर असे जंगल पसरलेले आहे. आणि हे निसर्गसौंदर्य पाहून मन अगदी प्रसन्न होते.

मेळघाटातील सेमाडोह या ठिकाणी आल्यावर निसर्गाशी आपला जवळचा संबंध प्रस्थापित होतो. निसर्गातील प्रत्येक गोष्ट आपल्याला काहीना काही शिकवत असते. गाविलगडच्या टेकड्यापासून वाहत येणारी सिपना नदी ही तापीनदीला जावून मिळते. सिपना नदी ही तापी नदीची उपनदी आहे. या भागात गोंड व कोरकु जमाती आढळून येतात यांची विशिष्ट जीवनपद्धती आढळून येते. सेमाडोह येथे असलेल्या हॉलच्या खांबावर या लोकांनी आपली सांकेतीक चिन्ह प्राणी व देवतांची चित्रे कोरल्याचे आढळून येते तसेच सेमाडोह येथे म्युझीयम आहे या संग्रहलयामुळे या भागात आढळणारे प्राणी, वनस्पती, वृक्ष, नदी, लोक यांची संपूर्ण माहिती आपल्याला मिळते.

५. कोलकास

सेमाडोह पासून जवळच निसर्गाच्या कुशीत वसलेले आणखी एक स्थळ म्हणजे कोलकास येथील शांतता अनुभवली की, याच ठिकाणी स्थायीक होण्याची इच्छा होते. शांत निसर्गरम्य परिसर उंच उंच झाडे, वनस्पती पाहत मुख्य प्रवेश व्दारातुन आत जातांना निसर्गाचा विविधतेची जाणीव होते. या कोलकासच्या मुख्य प्रवेश व्दारापासून आत १ ते २ किमी अंतरावर विश्रामगृह बांधण्यात आले आहे.

६. आर्थिक जीवन

सुगमतेच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास या भागात चिखलदरा व धारणी तालुक्यातील उत्तरेकडील भागात सुगमता कमी आहे. म्हणून येथे आर्थिक जीवन विकसित दिसून येत नाही. येथील बहूतांश प्रदेश हा डोंगराळ, घनदाट जंगल,

Yashshakti Arts & Science College * Amravati *

प्राचार्य
...शक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
अमरावती

तीव्र उतार, दुर्गम प्रदेश इत्यादी कारणामुळे या भागात वाहतूकीचा प्रवास होऊ शकला नाही. त्याचप्रमाणे दळणवळणाचा विकास सुद्धा होवू शकला नाही.

या प्रदेशामध्ये जास्तीत जास्त आदिवासी जमातीचे लोक आढळून आले आहे. येथील लोक आपला उदरनिर्वाह करण्याकरीता सधन (Intensive Farming) प्रकारची शेती करतात. त्याचप्रमाणे जोड धंदा म्हणून मोहाची फुले, चारोळी, आंबा, फणस, आवळा, लाख, डिंक, सोयाबीन, भात, मिरची, कापूस इ. उत्पादने उदरनिर्वाह व व्यवसायाच्या दृष्टिने एकत्रित करतात. याशिवाय जंगलातून फळे, कंदमुळे, मध एकत्र करतात आणि ते विकून पैसा मिळवितात. त्याचबरोबर जंगलातील विविध वन औषधी मिळविणे आणि विविध वृक्षांच्या लाकडापासून कलाकुसरीच्या वस्तु, तयार करण्यात येतात, त्यापासून आपला उदरनिर्वाह करतात.

## ७. सामाजिक जीवन

कोरकू लोकांची एक वेगळी जीवनशैली व वेगळी संस्कृती आहे. बऱ्याच काळापासून पिढ्यानपिढ्या हे लोक मेळघाटामध्ये राहतात. कोरकूंची जीवन जगण्याची पद्धती ही सामान्य माणसापेक्षा वेगळी आहे. कोरकू लोकांमध्ये स्त्रीप्रधान संस्कृती आढळून येते. कुटुंब प्रमुख म्हणून कोरकू स्त्री काम पाहत असते. या आदिवासी लोकांची बोलीभाषा कोरकू आहे. सागाच्या वृक्षाला हे लोक सिपन म्हणतात.

कोरकू लोक एका विशिष्ट प्रकारचा पोशाख घालतात. त्यामुळे ते इतर लोकांपेक्षा वेगळे दिसतात. त्यांच्या डोक्याला नेहमी शेला बांधलेला असतो. पुरूष धोतर, विणार व दुपट्टा ही वस्त्रे अंगावर पुरूष घालतात. तर स्त्री वर्ग लुगडे घालतात. कोरकू स्त्री व पुरुष अंगावर विविध चिन्हे गोंदतात.

येथील लोक सन उत्सव मोठ्या आनंदान साजरा करतात. या लोकांचा मुख्य सन हा होळी असतो. पाच दिवस होळी हा सन साजरा केला जातो. रात्री

मोठ्या संख्येने कोरकू लोक एकत्र येतात. आनंदाने ढोलकी सुरात वाजवून पारंपारिक नृत्य करतात. पारंपारिक गाणी सुद्धा गातात.

## ८. निष्कर्ष

चिखलदरा, मेळघाट, सेमाडोह, कोलकारा ही पर्यटन स्थळे मानवाची मनोवेधक आहे. त्यामुळे तेथे पर्यटकांचे आकर्षण मोठ्या प्रमाणात आहे. येथील पर्यटनाच्या दृष्टिकोनामधून निरीक्षण केल्यास पुढीलप्रमाणे निष्कर्ष निघतात.

- येथील प्रदेश हा डोंगर दऱ्या, दुर्गम भाग असल्यामुळे येथे वाहतूक मोठ्या प्रमाणात नाही, त्यामूळे आदिवासी जमात ही अविकसित आहे.
- या ठिकाणचे लोक मोठ्या प्रमाणात परंपरागत शेतीवर आधारित उद्योग करतात यामुळे कृषी उत्पादन कमी आहे व त्यामुळे येथील कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे.
- पर्यटन स्थळ असले तरी पर्यटनाचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला नाही, त्यामुळे विदेशी पर्यटक दिसून येत नाही.
- येथे येणारे बहुतांश पर्यटक एका दिवसाकरीता येतात, त्यामुळे येथील पर्यटन उद्योगाचा विकास झालेला नाही.
- पर्यटन स्थळांचे निरीक्षण केल्यावर असे आढळते की, बहुतांश स्थळांना तटबंदी बांधलेल्या नाही. त्यामुळे अपघात होण्याची भिती आहे.
- बऱ्याचश पर्यटन केंद्राच्या ठिकाणी पर्यटक माहिती केंद्राची गरज आहे, की ज्याव्दारे पर्यटकांना सोयी सुविधा उपलब्ध होतील.
- पर्यटकांना राहण्याकरिता निवासांची व्यवस्था मोठ्या प्रमाणात नाही त्याचबरोबर हॉटेल्सची देखील कमतरता आहे.

प्राचार्य
वाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
अमरावती.

# शैक्षणिक सहलीचा अहवाल

युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय अमरावती येथील वर्ष २०२१-२२ शैक्षणिक सहल दि. १९/११/२०२१ शनिवार रोजी चिखलदरा येथे नेण्यात आली. बी.ए. भाग३ मधील अभ्यासक्रमामध्ये शैक्षणिक सहलीचा सहभाग करण्यात आला आहे याचा मुख्य उदेश विध्यार्थ्यांना भोगोलिक पर्यावनासबंधी माहिती देणे हा आहे. या करिता २२ आसनाची श्रद्धा टुर्स अँड ट्रावल्स ची बस ठरवण्यात आली. या सहलीकरिता बि.ए.भाग३ चे वीस विध्यार्थी व इतर विद्यार्थी मिळून एकूण चोवीस विद्यार्थी व भूगोल विभाग प्रमुख प्रमुख प्रा. आनंद धोटे व समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.आनंद मनवर सकाळी ८.०० अमरावती येथून प्रस्थान केले व चिखलदरा येथिल भीमकुंड , गाविलगड किल्ला , पचबोल पॉइंट, देवी पॉइंट पवनचक्की, सेमाडोहो, कोलखास इत्यादी पॉइंट पहिले.

या सहलीच्या माध्यमातून विद्यार्थांना भूपृष्ठरचना अंतरानुसारकशीबदलत जाते याची माहिती दिली तसेच हवामानामध्ये झालेला बदल समजावून सांगितला व ,त्या नुसार वनस्पती मध्ये झालेला बदल निदर्शनास आणून दिला, तसेच चिखलदरा मेळघाट परिसरामध्ये असलेली जगले त्यातील वनस्पती त्यांच्या जाती याची माहिती दिली.

मेलघाट व चिखलदरा भागामध्ये राहणाऱ्या आदिवासी जमाती व त्याची जीवनशैलीया संबंधी माहिती सुद्धा देण्यात आली.

सदर सहलीचा अहवाल विद्यार्थ्यांनी तयार केला.

Yuvashakti Art's & Science College * Amravati *

प्राचार्य
युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
अमरावती.

**संमती पत्र**

युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालयाची येथील शैक्षणिक सहल दि. १९/११/२०२१ रोजी चिखलदरा जात आहे माझा मुलगा/ मुलगी ____________________ बि. ए./ बि. एसी. भाग १,२,३, मध्ये शिकत असून या सहलीला जाण्याची मी पाल्य या नात्याने सहलीमध्ये सहभागी होण्याची संमती देत आहे.

सही : ____________________

नाव : ____________________

Dr. Anand R. Dhote
Head of Deptt. Geography
Yuvashakti Arts & Science College
Amravati.

---

**संमती पत्र**

युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालयाची येथील शैक्षणिक सहल दि. १९/११/२०२१ रोजी चिखलदरा जात आहे माझा मुलगा/ मुलगी ____________________ बि. ए./ बि. एसी. भाग १,२,३, मध्ये शिकत असून या सहलीला जाण्याची मी पाल्य या नात्याने सहलीमध्ये सहभागी होण्याची संमती देत आहे.

सही : ____________________

नाव : ____________________

Yuvashakti Arts & Science College * Amravati *

प्राचार्य
युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
अमरावती

Dr. Anand R. Dhote
Head of Deptt. Geography
Yuvashakti Arts & Science College
Amravati.

युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय, अमरावती.

भूगोल विभाग

शैक्षणिक सहल

FeedbackFrom

1) सहलीचा तुमचा अनुभव कसा आहे

अ) चांगला ब) अती चांगला क) खराब ड) अती खराब

2) सहलीचे ठिकाण कसे होते

अ) चांगला ब) अती चांगला क) खराब ड) अती खराब

3) सहलींकरिता प्रवासाकरिता केलेली वेवस्था कशी होती.

अ) चांगली ब) अती चांगली क) खराब ड) अती खराब

4) सहलीच्या माध्यमातून आपणास भोगोलिक माहिती मिळाली काय

अ) होय ब) नाही

5) भूगोल विषयाच्या प्राध्यापकांनी तुम्हाला सहलीच्या ठिकाणची भोगोलिक माहिती कशी दिली

अ) चांगली ब) अती चांगली क) खराब ड) अती खराब

6) एकंदर सहलीस तुम्ही किती गुण दयाल

अ) जास्त ब) कमी क) अती कमी ड)अती जास्त

7) सहलीवर तुम्ही अहवाल तयार कराल काय

अ) होय ब) नाही

8) सहली समंधी आपला अभिप्राय थोडक्यात मांडा.

________________________________________

________________________________________

नाव ____________________________

वर्ग ____________________

सही ____________________

Yuvashakti Arts & Science College * Amravati *

प्राचार्य
युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
अमरावती

To,
Principal, ... Arts and Science

# Yuvashakti Arts & Science college, Amt.
## Year 2021-22
## Dept of Geography

### Study Tour or Socio-Economic Field Survey

**Attendance Sheet**

| Sr. No | Name | class | Signature |
|---|---|---|---|
| 1 | Ruvan Rashid surpatne | B.A. III | R.R. Surpatne |
| 2 | Vijay Sheshrao Pawar | B.A. III | V Pawar |
| 3) | Yasin Anjir Kedar | B.A. III | Yasin |
| 4) | Sanket Pramod Kene | B.A. III | S.P. Kene |
| 5) | Gunjan Bharo Darsimbe | B.A. III | Gunjan Darsimbe |
| 6) | Harshad Piton Pale | B.A. III | Harshad Pale |
| 7 | Akash Imam surpatne | B.A. III | Akash |
| 8 | Harshadip Fakira Surpatne | B.A. III | H.Surpatne |
| 9 | Anil Haridas surpatne | B.A. III | anil Haridas |
| 10 | Vishal Kundlik Bele | B.A. III | V Bele |
| 11 | Arjun uttam adhav | B.A. III | A adhav |
| 12 | Dipak Prakash Chavhan | B.A. III | Dipak P.C. |
| 13 | [illegible] gajanan Thakre | B.A. III | [illegible] |
| 14 | Shubham Dhanraj Kale | B.A. III | Shubham Dhan Kale |
| 15) | pravin Harichand Darshinde | B.A. III | Pravin Darshinde |

Yuvashakti Arts & Science College, Amravati

प्राचार्य
युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
अमरावती.

**Yuvashakti Arts & Science college, Amt.**
**Year 2021-22**
**Dept of Geography**

**Study Tour or Socio-Economic Field Survey**

**Attendance Sheet**

| Sr. No | Name | class | Signature |
|---|---|---|---|
| 16. | Ankush Rangalal Selukar | B.A. III | A-R Selukar |
| 17 | Ramder Zanaklal Jaoorkar | B.A. III | Ramder |
| 18 | Gaurav Sanjayrao Sawlakhe | B.A. III | G.S. Sawlakhe |
| 19 | Dipak Motilal sokam | B.A. III | Dipak Sokam |
| 20 | Kamlesh Arun Dhurve | B.A. III | Kamlesh |
| 21 | Ashwini sudhakar Gureobhele | BA - II | Ashwini |
| 22 | Vishal Pratap Kathale | BA - II | Vishal |
| 23 | Shrikrushna Dipak Kale | BA - I | Shri Kale. |
| 24 | yogesh shriram kale | B.A. I | yogesh Kale |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

Yuvashakti Arts & Science College * Amravati *

प्राचार्य
युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय
अमरावती.